## ////आतील पानात वाचा

- बाबा आढाव : अन्यायाविरुद्ध झुंज देणारा संघर्षयोद्धा...
- खर्चिक अधिवेशनांची फलश्रुती किती ?
- वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा बळी ; आकडा ४२ वर...



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : ११८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.११ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# टोलबाबत मोठी बातमी; सरकारचा निर्णय, तरीही त्या वाहनांना टोलमाफी का नाही?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विविध प्रश्नांवरून वातावरण तापत असताना आज विधानसभा अध्यक्षांनी सरकारला महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून टोलची सुरू असलेली बेकायदेशीर वसुली थांबवण्यासाठी म हाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी बुधवारी सरकारला कडक निर्देश दिले. टोलमाफीसंदर्भातील शासन निर्णय लागू असूनही टोल आकारणी सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, 'पुढील आठ दिवसांत एकाही ई-वाहनधारकाकडून टोल आकारला जाता कामा नये', असा अल्टिमेटम नार्वेकर यांनी सरकारला दिला.

प्रश्नोत्तर तासादरम्यान आमदार अनिल पाटील, शंकर जगताप, आणि राहुल कुल यांनी हा मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत मुंबई-पुणे एक्सप्रेसवे, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू (शिवडी-नावा शेवा लिंक) या मार्गांवर प्रवासी ई-वाहनांसाठी संपूर्ण टोलमाफी जाहीर करण्यात आली होती. तरीही ऑगस्टपर्यंत अनेक टोल प्लाझांवर टोल आकारणी सुरूच असल्याची तक्रार आमदारांनी मांडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नाला उत्तर देताना पूर्ण टोलमाफीचा निर्णय सरकारने घेतल्याचे सांगितले. त्यांनी स्पष्ट केलं की अटल सेतूसाठी २१ ऑगस्ट २०२५ आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवे व समृद्धी महामार्गासाठी २२ ऑगस्ट २०२५ रोजी आवश्यक अधिसूचना काढण्यात आल्या. तरीही काही टोल नाक्यांकडून तत्काळ अंमलबजावणी न झाल्याचे त्यांनी मान्य केले.



एकनाथ शिंदे यांनी पुढे बोलताना सांगितलं की, टोलसंबंधी निर्णयांची अंमलबजावणी एमएसआरडीसी आणि एमएमआरडीए करत असून अधिसूचना निघाल्यानंतर विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि, प्रत्यक्षात अद्यापही टोल वसुली सुरू असल्याचे आमदारांनी ठाम पणे सांगितले. यावर अध्यक्ष नार्वेकर यांनी हस्तक्षेप करत सरकारला तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. 'जीआर आलाय, मग अंमलबजावणी झालीच पाहिजे. कोणत्याही टोल नाक्यावर ई-वाहनधारकांकडून पैसे घेऊ नका,' असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## कसबा मंदिर १५ डिसेंबरपासून बंद, कारण...

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.१०, : पुणे :** ग्रामदैवत श्री. कसबा गणपती मंदिर देवस्थान ट्रस्टच्या वतीने मंदिरातील मुख्य दैवत श्री. गणेश मूर्तीच्या शेंदूर कवच दुरुस्ती प्रक्रियेस सोमवार, दि. १५ डिसेंबर पासून प्रारंभ होणार आहे. त्यामुळे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंदिर सर्व भाविकांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. मंदिराच्या आतापर्यंतच्या उपलब्ध असलेल्या इतिहासात अशी प्रक्रिया प्रथमच घडत असल्याची माहिती देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार यांनी पत्रकार परिषदेत दिली. गेल्या काही दिवसांपासून ऐतिहासिक पुरातन स्वयंभू श्रींच्या मूर्तीवरील शेंदूर मिश्रित कवचगळून पडत आहे. ग्रामदैवत श्री. कसबा गणपती तमाम गणेशभक्तांचे नवसाला पावणारे आराध्यदैवत आहे. त्यामुळे भविष्यात कुठलाही दुर्धर प्रसंग उद्भवू नये, म्हणून सध्या असलेले शेंदूर कवच लवकरात लवकर काढणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता शेंदूर कवच दुरुस्ती प्रक्रिया करण्यात येणार आहे. शेंदूर कवच काढण्याकरीता विविध मूर्तीतज्ज्ञ, धार्मिक क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच पुरातत्व खात्याकडूनही मार्गदर्शन घेण्यात आले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया विधिवत आणि शास्त्रोक्त पद्धतीने या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. ही प्रक्रिया विशेषत: श्रींच्या मुख्य रोजच्या पूजेच्या मूर्तीवर करण्यात येणार आहे.

**▶ कालावधी कमी होऊ शकतो...**

शेंदूर कवच काढणे व त्याअनुषंगाने आवश्यक ती कामे ही सर्व प्रक्रिया अतिशय संवेदनशील असल्यामुळे साधारण तीन आठवडे लागणे अपेक्षित आहे. कदाचित हा कालावधी कमी होऊ शकतो किंवा वाढूही शकतो. मात्र याचा अंदाज प्रत्यक्ष काम सुरु झाल्यावरच येईल. इथून पुढे होणा-या कामाचा योग्य आढावा घेऊन मंदिर लवकरात लवकर भाविकांसाठी खुले करण्याचा व्यवस्थापन समितीचा अत्यंत प्रामाणिक मनोदय आहे.


**▶ अनेक कारणांसाठी इतिहासात प्रसिद्ध**

पुण्यातील अतिप्राचीन मंदिरांपैकी एक, ग्रामदैवत अशी कालातीत उपाधी प्राप्त असलेले श्री. कसबा गणपती मंदिर अनेक कारणांसाठी इतिहासात प्रसिद्ध आहे. इसवी सन १६१४च्या आसपास या मंदिराचे उल्लेख आढळतात. जय मिळवून देणारा असा जयति गजानन असे प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याचे वर्णन केले आहे. मंदिर धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय असून, पुणेकरांच्या दैनंदिन आयुष्यत या मंदिराचे स्थान अनन्यसाधारण आहे.

## पारनेरमध्ये बिबट्या जेरबंद !

### वृद्ध महिलेवर हल्ला करणारा हाच बिबट्या असल्याचा अंदाज

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील किन्ही येथे एका बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले आहे. २ डिसेंबर २०२५ रोजी एका वृद्ध महिलेवर हल्ला करून तिचा जीव घेणारा हाच बिबट्या असल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे. किन्ही येथील नरभक्षक बिबट्याच्या हल्ल्यात ७० वर्षीय भागुबाई खोडदे यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर ग्रामस्थांनी बिबट्याला ठार करण्याची मागणी केली होती. वन विभागाने या परिसरात १३ पिंजरे लावून बिबट्याला पकडण्यासाठी जेरबंद करण्यासाठी मोहीम राबवली. बुधवारी पहाटे हा बिबट्या पिंजऱ्यात अडकला. संगमनेर आणि दौंड येथील रेस्क्यू टीम ट्रँक्विलाइज गनसह या मोहिमेत सहभागी झाल्या होत्या. उपवन संरक्षक धर्मवीर सालविठ्ठल आणि सहाय्यक वन संरक्षक अश्विनी दिघे यांच्या आदेशानुसार, वन क्षेत्रपाल गजानन धाडे यांच्या मार्गदर्शनाखाली २ नोव्हेंबरपासून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी हे ऑपरेशन सुरू करण्यात आले होते. जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यांची संख्या वाढल्याने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेताला पाणी देणे कठीण झाले आहे. तसेच शेतीसाठी मजूर मिळणेही अवघड झाले आहे. महिनाभरात बिबट्याच्या हल्ल्यात किन्ही येथील भागुबाई खोडदे यांचा चौथा बळी ठरला. जेरबंद झालेला बिबट्याच हल्लेखोर असावा, असा प्राथमिक अंदाज वन विभागाचे अधिकारी धाडे यांनी दिव्य मराठीशी बोलताना व्यक्त केला आहे. पारनेर वनविभाग, टाकळी ढोकेश्वर वनविभाग, संगमनेर वनविभाग रेस्क्यू टीम आणि किन्ही ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही बचाव मोहीम यशस्वी झाल्याचे धाडे यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही - उपमुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, मुंबई :** लाडकी बहीण योजना ही सरकारची लोकाभिमुख आणि जनकल्याणकारी योजना असून ती कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. योजना सुरू करताना आम्ही सकारात्मक भावनेने निर्णय घेतला, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य सुनील प्रभू, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, हारून शेख यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात एका लक्षवेधी सुचनेद्वारे विचारणा केली असता, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उत्तर दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आचारसंहितेच्या काळातही लाभार्थींना अडथळा येऊ नये म्हणून आगाऊ निधीही उपलब्ध करून देण्यात आले होते. लाभार्थी बहिणींनी सरकारच्या कामावर विश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात जनादेश दिला आहे. त्यामुळे ही योजना कमी करणे किंवा बंद करणे तर दूरच, आम्ही ज्या-ज्या घोषणा केल्या आहेत त्या योग्य वेळी पूर्ण केल्या जातील.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजना ही राज्यातील लाखो महिलांसाठी मोठा आधार असून तिचा विस्तार आणि लाभ सातत्याने सुरु राहील. शासन दिलेल्या सर्व वचनांची पूर्तता करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींच्या अचूक प्रम णीकरणासाठी ई-केवायसी प्रक्रियेत मोठी प्रगती

- महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

लाडकी बहीण योजनेसाठी एकूण २ कोटी ६३ लाख ८३ हजार ५८९ अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी २ कोटी ४३ लाख ८२ हजार ९३६ अर्ज विभागाने पात्रतेनुसार ग्राह्य धरले. उर्वरित फॉर्म हे प्राथमिक पडताळणीतच अपात्र ठरले होते.

माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या २६ लाख अर्जांच्या डेटाचे क्रॉस-व्हेरिफिकेशन करताना केवळ ४ लाख अर्जांचे पुनर्पडताळणीची आवश्यकता आढळली. उर्वरित सर्व अर्ज पात्र लाभार्थी म्हणून निश्चित करण्यात आले. योजनेसाठी आवश्यक असलेली विभागनिहाय माहिती ही संबंधित विभागांकडून म ागवण्यात आली होती. कृषी विभागाकडील नमो शेतकरी योजनेचे लाभार्थी, अन्न व नागरी पुरवठा विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाकडील डेटाचा वापर करून लाभार्थ्यांची सखोल पडताळणी करण्यात आली.

लाभ घेण्यास अपात्र असलेले सुमारे ८ हजार शासकीय कर्मचारी (मुख्यतः आरोग्य व इतर सरकारी यंत्रणांमधील कर्मचारी) यांनी घेतलेले रकमेची रिकव्हरी प्रक्रिया मागील ५-६ महिन्यांपासून सुरू असून पुढील दोन महिन्यांत पूर्ण होणार आहे.

साधारणपणे १२ ते १४ हजार महिलांच्या नावावर पुरुषांची बँक खाती जोडलेली असल्याचे पडताळणीत दिसून आले. अनेक महिलांची वैयक्तिक खाती नसल्याम ुळे त्यांनी घरातील वडील, भाऊ किंवा पती यांची खाती दिल्याचे स्पष्ट झाले. विभागाने अशा प्रकरणांचे सखोल परीक्षण करून कोणतीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री केली आहे.

लाभार्थींचे अचूक प्रमाणीकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ई-केवायसी प्रक्रियेत मोठी प्रगती झाली असून, आत्तापर्यंत १ कोटी ७४ लाखांहून अधिक महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. ई-केवायसीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर असून, उर्वरित लाभार्थ्यांनाही ही सुविधा उपलब्ध आहे.

## ११ महिन्यांत ३८२ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळलं

**दि.१०, नाशिकरोड :** अतिवृष्टी, अवकाळी यासारख्या नैसर्गिक आपत्तीसह कर्जबाजारीपणामुळे नाशिक विभागात गेल्या अकरा महिन्यांत ३८२ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविल्याचे धक्कादायक वास्तव आहे. नाशिक विभागात शेतकरी आत्महत्येच्या १८१ इतक्या सर्वात जास्त घटना एकट्या जळगाव जिल्ह्यात घडल्या असून, त्याचे प्रमाण जवळपास एकूण घटनांच्या निम्मे आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या एवढ्या मोठ्या संख्येने घटना घडल्याने शासकीय पातळीवर देखील हा चिंतेचा विषय ठरला आहे. शासकीय पातळीवरून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या जात असूनही, शेतकरी आत्महत्येच्या घटनांचा आलेख थांबलेला नाही. नाशिक विभागात जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या अकरा महिन्यांच्या कालावधीत शेतकरी आत्महत्येच्या ३८२ घटना घडल्या, ही बाब चिंताजनक आहे. सर्वाधिक आत्म हत्येच्या घटना जळगाव जिल्ह्यात, तर त्याखालोखाल १०१ इतक्या शेतकरी आत्महत्येच्या घटना अहिल्यानगर जिल्ह्यात घडल्या आहेत. धुळे जिल्ह्यातदेखील शेतकरी आत्महत्येच्या ८४ घटना घडल्या आहेत.

## अवकाळीच्या नुकसानीची भरपाई कधी मिळणार? खा.नीलेश लंकेंचा सवाल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यनगर :** चार महिन्यांपूर्वी सप्टेंबर, ऑक्टोबरम ध्ये झालेल्या अवकाळी पावसाने अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघात बागायती पिकांचे प्रचंड नुकसान झाले. लिंबू, मोसंबी, संत्रा बागांची मोठ्या प्रमाणात सड झाली. द्राक्ष,कांदा,डाळिंब उत्पादकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई कधी मिळणार. महाराष्ट्रातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने जाहीर केलेले विशेष पॅकेज नेमके कुठे अडकले आहे.असे विविध सवाल खासदार नीलेश लंके यांनी आज, मंगळवारी (९ डिसेंबर) संसदेत उपस्थित केले.नाफेड,एनसीसीएफ मार्फत खरेदी करण्यात आलेल्या कांद्याचे शेकडो कोटी रुपये अद्याप शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत ही बाबही खासदार लंके यांनी निदर्शनास आणून दिली.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल केंद्राकडे पोहोचला आहे का? विशेष नुकसानभरपाई पॅकेज मंजूर झाले आहे का? शेतकऱ्यांचे अडकलेले पैसे नेमके कधी मिळणार? असे विविध सवाल खासदार लंके यांनी उपस्थित केले.



खासदार लंके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान म्हणाले की, महाराष्ट्रासह सर्व राज्यांना केंद्र सरकार पुरेपूर मदत देत आहे. एनडीआरएफ व एसडीआरएफद्वारे मोठा निधी राज्यांना उपलब्ध करून देण्यात येत असून ३३ टक्के नुकसान असेल तरी मदतीचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेतून ३.६९ कोटी शेतकऱ्यांना २६ हजार ३४२ कोटींची भरपाई देण्यात आल्याचे सांगतानाच विमा कंपन्यांनी विलंब केल्यास १२ टक्के व्याजाने भरपाई देणे बंधनकारक केल्याचे चौहान म्हणाले.

खासदार नीलेश लंके यांनी मोसंबी, संत्रा, कागदी लिंबू, कांदा, द्राक्ष, डाळिंब अशा पिकांच्या झालेल्या कोट्यवधींच्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित करतानाच बाजारातील मंदी आणि नाफेड-एनसीसीएफकडे अडकलेले शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये यासाठी खासदार लंके यांनी सरकारला जबाबदार धरले.

नुकसानीच्या पंचनाम्यातील तांत्रिक अडचणी, नुकसान भरपाईला सातत्याने होत असलेला विलंब, विमा कंपन्यांकडून दावे नाकारण्याचे वाढते प्रमाण, अपुरा मोबदला याकडे खासदार लंके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

ते म्हणाले की, डिजिटल पंचनामा अनिवार्य करा,३० दिवसात भरपाईची रक्कम निश्चित करा, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक बनवा अशी मागणी खासदार लंके यांनी केली.





## अभिनयातील भीष्माचार्य

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली.

दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल – ए – आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही.

१९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान – ए – इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनयातील भीष्माचार्य, अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

# बाबा आढाव : अन्यायाविरुद्ध झुंज देणारा संघर्षयोद्धा



दि. ०८ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथे ज्येष्ठ समाजवादी नेते, विचारवंत, श्रमिकांचा आवाज, रिक्षाचालक–कामगार–हमाल–वंचित घटकांसाठी आयुष्य अर्पण करणारे प्रख्यात समाजसेवक बाबा आढाव यांचे निधन झाले आणि महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील सामाजिक चळवळींचा एक दीपस्तंभ कायमचा मावळला आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील श्रमिक चळवळींच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय संपुष्टात आला आहे. ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून तब्येत बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु दि. ०८ डिसेंबर रोजी उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती नव्हे तर चार–पाच पिढ्यांना दिशा देणारी मूल्यव्यवस्था, आंदोलनाची परंपरा आणि सामाजिक न्यायाची अखंड ज्वाला हरवली आहे.

बाबा आढाव यांचा जन्म १९३० च्या दशकात झालेला असला तरी त्यांचे आयुष्य गांधी–समाजवादी तत्त्वज्ञानावर बेतलेले होते. मार्क्सवादी विचारधारा, समाजवादी विचार आणि मानवी हक्क हे त्यांच्या कार्याचे मूळ केंद्र होते. त्यांनी महाविद्यालयीन काळातच समाजाची खरी वास्तवता जवळून पाहिली आणि अन्याय, विषमता आणि शोषण याविरुद्ध एक लढवय्या व्यक्तिमत्त्व त्यांच्या अंतर्मनात तयार झाले. त्या काळापासून मृत्यूपर्यंत त्यांनी एकही दिवस अन्यायाविरुद्धची भूमिका ढिली केली नाही. सत्ता, मान–सन्मान, पद, लाभ यापासून कायम दुरावलेल्या पण लाखो लोकांच्या अंतःकरणात महत्त्वपूर्ण स्थान असलेले ते खरे सामाजिक नेता होते.

बाबा आढाव यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे महाराष्ट्रातील असंघटित मजूर आणि श्रमिक घटकांना संघर्षाची भाषा, संघटनेचे बळ आणि अधिकारांचे भान देणे. हमाल, रिक्षाचालक, बांधकाम कामगार, साखर कारखान्यांतील स्थलांतरित कामगार, महिला श्रमिक, ग्रामीण कामगार यांना संघटित करण्याचे ऐतिहासिक काम त्यांनी केले. पुण्यात त्यांनी स्थापन केलेली हमाल–मजूर पंचायत आणि नंतर महाराष्ट्रभर उभारलेल्या सामाजिक न्याय आंदोलनांनी अनगणित कुटुंबांचे आयुष्य बदलले. श्रमिक वर्गाला किमान वेतन, नोंदणी हक्क, आरोग्य सुरक्षा, पेन्शन, शासकीय योजना, शोषणापासून मुक्ती, मानवी सन्मान आणि श्रमाचा आदर या मूलभूत हक्कांसाठी त्यांनी सातत्याने लढा दिला.

बाबा आढाव यांचे आंदोलन हिंसाचारी नव्हते; ते तत्त्वनिष्ठ, अहिंसावादी आणि मानवी हक्कांवर आधारलेले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ऐतिहासिक सत्याग्रह झाले. त्यांचा संघर्ष मात्र प्रखर होता आणि त्यात भीडण्याची क्षमता असंख्य सामान्य माणसांना त्यांनी दिली. त्यांच्या नेतृत्वात हजारो रिक्षाचालकांनी रस्त्यावर उतरून न्याय मिळवला. त्यांनी रिक्षाचालकांना फक्त भाडे नव्हे तर सन्मान मिळायलाच हवा या विचाराला सार्वजनिक व्यासपीठावर मान्यता मिळवून दिली. शहरातील आणि ग्रामीण भागातील श्रमिकांना नागरिकत्वाची जाणीव देणारा नेता म्हणजे बाबा आढाव होते. हे वाक्य आज समाजविज्ञानाच्या अभ्यासक्रमांमध्ये उदाहरण म्हणून नोंदले जाते.

बाबा आढाव यांच्या विचारविश्वात फक्त श्रमिक प्रश्न नव्हते; जातीय असमानता, भेदभाव, ग्रामीण दारिद्र्य, महिला हक्क, शेती–अर्थव्यवस्था, शिष्टाचार नसलेली विकासनीती आणि राजकीय स्वार्थ याविरुद्धही त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे. त्यांचे प्रसिद्ध आंदोलन एक गाव, एक पाणवठा हे



**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२**

भारतातील सामाजिक समतेच्या इतिहासातील मोठा अध्याय आहे. अस्पृश्यतेविरुद्ध, जातभेदाविरुद्ध आणि सामाजिक एकात्मतेसाठी त्यांनी लढविलेली चळवळ ही महाराष्ट्रातील फुले–शाहू–आंबेडकर परंपरेचा पुढचा टप्पा मानली जाते.

त्यांच्याकडे कोणतेही सरकारी पद, राजकीय महत्त्वाकांक्षा किंवा सत्ता मिळविण्याचा आग्रह नव्हता. गांधीजींप्रमाणे साधेपणा, लोकहित आणि तत्त्वनिष्ठता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आधारस्तंभ होते. खादीचे कपडे, साधी जीवनशैली, अत्यंत संयमी संवाद, पण त्याहूनही कठोर प्रश्न विचारण्याची क्षमता यातून त्यांची ओळख तयार झाली. समाजवादी पक्षाच्या वैचारिक परंपरेचे ते जिवंत प्रतीक होते. अनेक पिढ्यांवर त्यांनी केलेले वैचारिक संस्कार आजही सामाजिक चळवळींचे मार्गदर्शक मानले जातात.

त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील सामाजिक आंदोलनांना, कामगार संघटनांना, प्रगतिशील साहित्याला आणि अभ्यासक–विद्यार्थी–संशोधकांना जणू दिशा देणारा दीपस्तंभ हरवला आहे. आज अनेक लोक ज्या सुविधा, सुरक्षा आणि अधिकारांचा लाभ घेतात, त्या अधिकारांवर स्वाक्षरी करण्यासाठी मागे बाबा आढाव यांच्यासारख्या लढवय्या व्यक्तीचे घाम, अश्रू आणि संघर्षाचे वर्षानुवर्षाचे योगदान आहे हे विसरून चालणार नाही.

त्यांच्या निधनाच्या बातमीने देशभरातून शोकसंदेश, श्रद्धांजली आणि कृतज्ञतेचे संदेश येत आहेत. पण खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या विचारांना, संघर्षाला आणि समतेच्या स्वप्नाला पुढील पिढ्यांनी जपणे आणि त्यासाठी आंदोलन सुरू ठेवणे आहे. त्यांच्या जाण्याने शरीर थांबले असले, तरी त्यांचे विचार, मूल्ये आणि लढा थांबलेला नाही.

आज आपण त्यांना अश्रुपूर्ण निरोप देत आहोत, पण त्याचवेळी त्यांच्या विचारांची मशाल पुढे नेण्याची शपथही घेत आहोत. समाजाच्या शेवटच्या घटकासाठी लढणे, दुर्बलांचे आवाज बनणे आणि न्यायासाठी झगडणे हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र होते, आणि तेच त्यांच्या जीवनाचे खरे स्मारक ठरेल.

बाबा, तुमचा संघर्ष आमच्या श्वासात आहे. आपण आमच्यातून गेलेत, पण तुमचा विचार आमच्यात जिवंत आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली...**

## सामोरा...

स्तुती सुमने उधळा
आहे जेंव्हा सामोरा
निंदा नालस्ती चालू
होता जरा पाठमोरा

कठिण रे ओळखणे
खरा कोणता चेहरा
अंतर्मनातले कळेना
बदलत राही मोहरा

रुपडे घेई वेगवेगळी
साळसूदपणे वावरा
वैराग्य दिसे जगाला
प्रसिद्धीसाठी हावरा

प्रश्न येई चित्र विचित्र
होतोयं कावराबावरा
तळ कधी न पाहिला
अगम्य अंधार विवरा

प्रकाश पाडला असा
लाजवेलतो दिनकरा
मध टपके ओठातूनि
माधुर्य वाटतो शर्करा

मनातलाकडवटपणा
दिसे ना कुणा नखरा
फारथोड्यांना माहीत
स्वभाव आमचा खरा

शब्द कधी न पाळला
वळण दिले ते अक्षरा
माझे अडाणी वागणे
कोड्यात पाडे साक्षरा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# खर्चिक अधिवेशनांची फलश्रुती किती ?



राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरनगरीत सोमवारपासून सुरु झाले आहे. यंदाचे हे अधिवेशन विविध गोष्टींमुळे चर्चेत आहे. ५८ वर्षानंतर पहिल्यांदाच हे अधिवेशन विरोधी पक्षनेत्याविना पार पडत आहे. केवळ सात दिवस चालणाऱ्या अधिवेशनाच्या सिद्धतेसाठी सरकारी तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने विधान भवन, रविभवन, नागभवन आणि आमदार निवासस्थानांसह विविध इमारती, रस्ते आणि त्यांच्या दुरुस्तीवर आजतागायत १०० कोटीहुन अधिक रुपये खर्च केले आहेत याशिवाय आमदारांच्या दैनंदिन सोयी सुविधा आणि खानपान यांसाठी सात दिवसांत प्रतिदिन २० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांवर दर महिन्याला पैसे तर पडत आहेत; मात्र रस्त्यावर वावरताना या लाडक्या बहिणी दिवसाढवळ्यासुद्धा स्वतःला असुरक्षित समजत आहेत, स्त्री अत्याचाराच्या बाबतीत शिवरायांच्या महाराष्ट्राने देशात आज अव्वल स्थान मिळवले आहे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मिळणारी तारीख पे तारीख, युती सरकार सत्तेवर आल्यापासून १ लक्ष १२ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची अधिकृत आकडेवारी यांसोबत नेहमीचे विषय आहेतच. यावेळी विरोधकांचे संख्याबळ कमी असले तरी सत्ताधारी मंत्री महोदयांना घेरण्याची पूर्ण सिद्धता त्यांनी केली असल्याचे पत्रकार परिषद घेऊन सुरुवातीलच सांगण्यात आले आहे.

राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक–बाधक चर्चा नेमकी किती काळ होते ? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे यामध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवरणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आमदारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते. अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो.

त्याचा विनियोग व्हायला नको का ? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी , एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते; मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मार्जिनल स्पेसचा बेकायदेशीर वापर : दोन लाखांची दंड वसुली



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर धडक कारवाई करण्यासोबतच मार्जिनल स्पेसचा बेकायदेशीर वापर करण्याविरोधातही धडक मोहीम राबविली जाते. आजही बेलापूर विभाग कार्यालयामार्फत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त डॉ राहुल गेठे व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांचे मार्गदर्शनखाली सीवूड सेक्टर ४२ येथील दुकानांसमोरील सामासिक जागेचा वापर करणाऱ्या ४२ व्यावसायिक आस्थापनांवर धडक कारवाई करून रू.२ लक्ष १३ हजार ५०० इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आली. बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त प्रशांत नेरकर आणि आत्माराम काळे, स्वप्नील तारमाळे व अतिक्रमण विभागाचे पोलीस पथक यांच्या उपस्थितीत ही मोहीम घेण्यात आली.

## जिजाऊ संस्था व जावली महाबळेश्वर प्रतिष्ठानचा मोफत वह्या व चष्मा वाटप उपक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०९, सातारा :** जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्था आणि दि ग्रेट जावली महाबळेश्वर प्रतिष्ठान या दोन प्रतिष्ठित सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप तसेच नागरिकांसाठी नेत्रतपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात नुकतेच पार पडले.

हा उपक्रम कै. अण्णासाहेब पाटील माध्यमिक विद्यालय, पंचक्रोशी म्हाते बुद्रुक ता. जावली येथे भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. म्हाते बुद्रुक हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा – म्हाते खुर्द, बुद्रुक, म्हाते मरा, गोंदेमाळ, वाघदरे, भामघर, गाळदेव तसेच श्री भैरवनाथ विद्यालय केळघर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळघर अशा विविध शाळांमधील जवळपास ५०० विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. याचसोबत म्हाते पंचक्रोशी तसेच केळघर पंचक्रोशीतील सुमारे १५० गरजूंनी नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटपाचा लाभ घेतला. शिक्षणाचा प्रकाश आणि आरोग्याचा उजेड हे दोन्ही महत्वाचे दिवे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावेत, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

दि ग्रेट जावली महाबळेश्वर प्रतिष्ठानचे आधारस्तंभ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे तसेच जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या प्रेरणेतून सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. समाजाभिमुख कामाची ही परंपरा या कार्यक्रमाद्वारे अधिक बळकट होताना दिसली.

या प्रसंगी म्हाते खुर्दचे सरपंच श्री. राजाराम दळवी यांनी म्हाते पंचक्रोशीतील प्रमुख गरजा स्पष्टपणे मांडत, संकटकाळात तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी अत्याधुनिक रुग्णवाहिकेची तसेच जावली तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी तालुका ठिकाणी स्पर्धा परीक्षा केंद्राची गरज अधोरेखित केली.

यावर प्रतिसाद देताना जिजाऊ संस्थेचे ठाणे शहरप्रमुख परेश कारंडे यांनी, या सर्व मागण्यांवर सकारात्मक पावले उचलण्यात येतील आणि जिजाऊ संस्थेचे कार्य सातारा जिल्ह्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा आमचा संकल्प दृढ आहे, अशी भावना व्यक्त केली.

सातारा जिल्हा शिवसेना सहसंपर्क प्रमुख एकनाथ ओंबळे यांनीही मेढा येथे आधुनिक सुविधांनी सज्ज असे स्पर्धा परीक्षा केंद्र उभारण्यासाठी लवकरच ना. एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पुढाकार घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

कार्यक्रमास सातारा जिल्हा शिवसेना सहसंपर्कप्रमुख एकनाथ ओंबळे दि ग्रेट जावळी महाबळेश्वर प्रतिष्ठान ठाणे अध्यक्ष शंकर दळवी,जिजाऊ सामाजिक संस्थेचे ठाणे शहरप्रमुख परेश कारंडे दि ग्रेट जावळी महाबळेश्वर प्रतिष्ठान ठाणे सेक्रेटरी विकास दळवी, नवयुग पतसंस्थेचे माजी अध्यक्ष सखाराम दळवी, मनोहर दळवी, संचालक वसंत दळवी, जावली बँकेचे माजी संचालक, अभयलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष आनंदराव सपकाळ, वेण्णा निरंजन पतसंस्थेचे संचालक विनोद शिंगटे म्हाते खुर्दचे सरपंच राजाराम दळवी जावळी महाबळेश्वर कृषी बाजार समिती संचालक हणमंत शिंगटे निवृत्त तालुका विस्तार अधिकारी रघुनाथ दळवी,उत्कर्ष मंडळाचे माजी अध्यक्ष दत्ता सपकाळ,पत्रकार संदीप गाडवे, रघुनाथ पार्टे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र गाडवे,म्हाते हायस्कूलचे मुख्याध्यापक भिसे, केळघर हायस्कूलचे मुख्याध्यापक जाधव, तसेच परिसरातील अनेक शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. शिक्षण व आरोग्य या दोन महत्वाच्या क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## डॉ.आंबेडकरांनी उपेक्षित समाजाला शक्तीशाली बनवले - प्रा.मेंढापुरे




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व इतिहास विभागवतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. आंबेडकर आणि आर्थिक-सामाजिक सुधारणा विषयावर अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.प्रदिप मेंढापुरे संवाद साधताना म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील प्रतिकूल परिस्थिती आणि गुलामीत असणाऱ्या समाजाला शहाणं करण्यासाठी जाणीवेतून सुशिक्षित बनवल्याशिवाय पर्याय नाही, यासाठी डॉ.आंबेडकर यांनी चातु:वर्णीय व्यवस्थेवर संविधान निर्मितीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय नीतिमूल्यांची पेरणी केली. वर्षानुवर्षे उपेक्षित असणाऱ्या समाजाला जाणीवेतून शक्तिशाली बनवले. जगाला आदर्श बनलेली लिखित राज्यघटना डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुपी बापमाणसाने निर्माण केलीयअशा शब्दांत महापरिनिर्वाण दिनी अभिवादन केले.

प्रा. मेंढापुरे पुढे म्हणाले-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ची स्थापना १ एप्रिल १९३५ रोजी हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींनुसार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा,१९३४ नुसार झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक सुधारणा विचारांवर आणि 'The Problem of Rupee' या त्यांच्या पुस्तकातील संकल्पनांवर आधारित असून हा साऱ्या भारतीयांचा गौरव आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.हणमंत जाधव होते. समारंभाचे प्रास्ताविक व उद्देश प्रा.रोहिणी मोरे यांनी आभार डॉ.प्रतिभा पाटणे यांनी केले. प्रा.अमीर इनामदार यांनी संयोजन केले.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा बळी !

## चंद्रपूर जिल्ह्यातील 'बळी' चा आकडा ४२ वर...



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चिमूर (चंद्रपूर) :** चिमूर तालुक्यातील शंकरपूर जवळील कवडशी देश गावातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. शंकरपूर- कवडशी रस्त्यालगत शेतशिवारात वाघाच्या हल्ल्यात एका ५२ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचे मंगळवारी (दि. ९) ला उघडकीस आले. शेषराव नथ्थू झाडे (वय ५२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेषराव झाडे हे सोमवारी (दि. ८) सायंकाळी शंकरपूर येथे बाजारहाट करण्यासाठी गेले होते. मात्र, त्यानंतर ते रात्री उशिरापर्यंत घरी परतले नाहीत. त्यांचा संपर्क न झाल्याने कुटुंबीयांनी मंगळवारी सकाळी शोध घेण्यास सुरुवात केली. दिवसभर शोध घेऊनही ते न सापडल्याने, मंगळवारी सायंकाळी गावकऱ्यांनी शेतशिवारात संयुक्तपणे शोध मोहीम सुरु केली.

शोध मोहिमेदरम्यान, शंकरपूर आणि कवडशीला जोडणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एमएसईबी (महावितरण) कार्यालयाजवळ त्यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेहावरील जखमा आणि परिसरातील परिस्थितीवरुन त्यांचा मृत्यू वाघाच्या हल्ल्यात झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

शेषराव झाडे यांच्या मृत्यूमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील मानव-वन्यजीव संघर्षातील बळींचा आकडा पुन्हा वाढला आहे. चंद्रपूर जिल्हा हा मोठ्या प्रमाणात वनसंपदा आणि वन्यजीव (विशेषत: वाघ) असलेली संवेदनशील जागा आहे. आजवर जिल्ह्यात झालेल्या या संघर्षामध्ये एकूण ४२ नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. यामध्ये सर्वाधिक बळी वाघाच्या हल्ल्यात झाले आहेत, ज्यांची संख्या ३८ आहे. याव्यतिरिक्त, बिबट्याच्या हल्ल्यात २ तर अस्वल आणि हत्ती यांच्या हल्ल्यात प्रत्येकी १ अशा एकूण ४२ नागरिकांचा बळी गेला आहे. वन्यजीव लोकवस्तीत येत असल्याने आणि शेतकरी व मजूर शेतीच्या कामासाठी जंगलात जात असल्याने हा संघर्ष अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. वनविभागाने या वाढत्या धोक्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांवर 'मकोका' लागू होणार

## 'एफडीए' मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे मानले आभार





**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, मुंबई :** गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांची गुन्हेगारी साखळी तोडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मकोका लागू करण्याची घोषणा विधिमंडळ अधिवेशनात केली असून यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) कारवाईसाठी बळकटी येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. याबद्दल मंत्री झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आणि सुगंधी सुपारी आणली जाते. यावर 'एफडीए'च्या जप्ती आणि फौजदारी कारवाई नंतरही विक्री होत असल्याने या गुन्हेगारी साखळीला रोखण्यासाठी 'महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेण्याची प्रक्रिया अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पातळीवर सुरू असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मकोका कारवाई करण्याची घोषणा करून विभागाच्या प्रस्तावाचे समर्थन केले आहे, असे मंत्री झिरवाळ म्हणाले.

मकोका कारवाईची घोषणा करताना गुटखा व अंमली पदार्थांवरील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी कठोर विशेष कायदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. 'महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री यांनी विधिमंडळ अधिवेशनात स्पष्ट केले. गुटखा, सुगंधी पान मसाला यावर राज्यात बंदी असूनही शाळा महाविद्यालयांच्या व परिसरातील दुकानांत गुटखा उत्पादन व विक्रेत्यांकडून नियमबाह्य विक्री केली जाते. गुटखा विक्री कारवाई अधीक प्रभावी व्हावी यासाठी गुटख्यासह सुगंधी सुपारी विक्रेत्यांनाही मकोकाच्या कक्षेत आणले जाणार आहे, तसा प्रस्तावच विधि व न्याय विभागाला पाठवणार असल्याची माहिती यापूर्वी अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली आहे.

## प्रा.आ. केंद्रात शवागृह नसल्यामुळे मृतदेहाची होत आहे हेळसांड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१०, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथे गेले कित्येक वर्षापासून शवागृह उपलब्ध नसल्याने मृतदेहांची हेळसांड होत आहे. तर यासाठी लोकप्रतिनिधीसह प्रशासनाने पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

कुंडलवाडी व आजूबाजूस असणारी खेडी, अनेकदा अपघाती किंवा बेवारस, जलनिमंजन (ड्रॉनिंग) मृतदेह ठेवण्यासाठी शवागृह उपलब्ध नसल्याने मृतदेहाची हेळसांड होत आहे. कुंडलवाडी शहरात नगरपालिका असून सुद्धा पण शवगृह उपलब्ध नाही. कुंडलवाडी येथील अनेक कुटुंबातील नातेवाईक कामानिमित्त परराज्यात वास्तव्यास आहेत. अशावेळी त्यांच्या कुटुंबात एखाद्याचा मृत्यू झाल्यास मुंबई / पुणे /हैद्राबाद अथवा परराज्यात असणारा नातेवाईक येईपर्यंत अनेक तासंतास मृतदेह तसाच ठेवावा लागत आहे. नातेवाईक कुंडलवाडी गावात पोहोचेपर्यंत काही तासांसाठी मृतदेह शवागृहात ठेवता यावा. बरेच वेळेत गंगेत पडल्यामुळे ओळख लवकर पटत नसते. अशा वेळेस तो मृत्यूदेह सुरक्षित रहावा, नातेवाईकाला आप्तेष्ट जणांना अंत्यविधी करण्यात यासाठी वेळ मिळावा. यासाठी शवगृह अत्यंत महत्त्वाचे आहे. पण राजकीय उदासीनता व अधिका-यांचे दुर्लक्ष यातून शवागृह उपलब्ध होत नाही शासकीय जिल्हा नियोजन समितीच्या फंडातून शवागृह उपलब्ध व्हावे. यासाठी नागरिकांकडून मागणी होत आहे.

## देवगाव विद्यालयात विद्यार्थ्यांना पोलिसांकडून आत्मसंरक्षण व स्पर्शज्ञानाचे धडे



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** आज देवगाव येथे कार्यक्रमात, बालकांचे लैंगिक अपराध, छळ, छेडछाड, अश्लीलता, अत्याचार तसेच बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी कायद्यात कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. संकटाच्या प्रसंगी तात्काळ डायल ११२ व १०९८ या आपत्कालीन सेवांचा वापर करावा, असे आवाहन लासलगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांनी केले.

डी.आर. भोसले विद्यालय, देवगाव येथे लासलगाव पोलीस स्टेशनतर्फे आयोजित 'विद्यार्थी सुरक्षा व स्वसंरक्षण' या कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. आपल्या भाषणात त्यांनी मोबाईलचा सुरक्षित वापर, गुड टच-बॅड टच ओळखण्याची पद्धत, सायबर क्राइमपासून संरक्षण, सोशल मीडियाचा जबाबदार वापर, वाहतुकीचे नियम याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच शाळेत येताना-जाता छळवणूक किंवा अशा प्रकारच्या घटनांची तात्काळ माहिती पालक व शिक्षकांना देण्याचे आवाहन केले.

मानवी शरीर हा सर्वात महत्त्वाचा दागिना असल्याने त्याची जपणूक सोन्याप्रमाणे करावी, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. महिला व मुलींनी सोशल मीडियावर फोटो टाकताना विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे होते. रेल्वे सुरक्षा बलाचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत गवई यांनी मानवी तस्करी व प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले, तर पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील यांनी महिला व बाल सुरक्षा तसेच डिजिटल जागरूकतेविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

यावेळी नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महिला सुरक्षा कायदा व सुव्यवस्थेवरील पथनाट्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमास पोलीस पाटील सुनील बोचरे, भास्कर बोचरे, मनोहर बोचरे, सुनंदा बोचरे, दिनेशकुमार शर्मा, प्राचार्य के.एम. गाजरे, पर्यवेक्षिका एस.ए. गांगुर्डे, एस.पी. गायकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# नागपूर अधिवेशनात शिव पाणंदचे सत्ताधारी, विपक्षांना पेरू वाटप

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.११, सुपा (अहिल्यानगर) :** राज्यातील शिव पाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर शिवपाणंदचे नागपूर अधिवेशनात विविध मागण्यांसह शासन निर्णय यांच्या अंमलबजावणीसाठी सत्ताधारी, विपक्षांना पेरू वाटप करत शेतरस्ता जनजागरणच्या टोप्यांचे वितरण चळवळीच्या शेतकऱ्यांनी केले. नागपूर अधिवेशनात पेरू वाटपचा ईशारा मुंबईत निवेदनाद्वारे दिला असता सरकारने नागपुर अधिवेशनात मुख्यमंत्री बळीराजा योजनेला तातडीची मान्यता दिली. याबद्दल सरकारचे चळवळीच्या वतीने सरकारचे आभार मानण्यात आले.



मात्र प्रलंबित मागण्यांसाठी लढा सुरूच रहाणार असल्याचा ईशारा शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिला.

१) महाराष्ट्रातील सर्व शिवरस्ते एक वर्षांच्या आत हद्द निश्चित/खुले करून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत त्यांचे तातडीने सरसकट मजबुतीकरण करण्यात यावे.

२) महाराष्ट्र सरकारने शिवपानंद शेतरस्ता संदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीचा कालावधी निश्चित करावा दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

३) राज्यातील प्रत्येक गावागावातील ग्रामशेतरस्ता समित्यांचा पारदर्शक अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी दर ३ महिन्याला घेऊन त्यावर योग्य त्या कारवाईच्या सूचना द्याव्यात.

४) राज्यातील गावागावातील नकाशा वरील असणाऱ्या नसणाऱ्या वहिवाट पाऊलवाट या सर्व शेत रस्त्यांचे सरसकट सीमांकन एक वर्षाच्या आत करून लांबी रुंदी सह गावदप्तरात नोंद घेऊन या सर्व रस्त्यांचे मजबुतीकरण व्हावे.

५) शेतरस्ता प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी माननीय उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली लोकआदालत प्रत्येक तीन महिन्याला आयोजित करून जास्तीत जास्त प्रलंबित शेत रस्ता केसेस तडजोडी अंतिम उपचाराने निकाली काढाव्यात म्हणजेच लोकन्यायालय आयोजित करून जास्तीत जास्त प्रकरणे वाद विवाद न करता मिटवावी.

६) शिव पाणंद व शेतरस्त्यांच्या निशुल्क संरक्षणाच्या घोषीत झालेल्या शासनिर्णयाची अंमल बजावणी न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

७) सरकारने सध्या काढलेल्या जीआर मध्ये झाडे लावण्याचा घेतलेला निर्णय हा भविष्यात वादविवादाचकारण ठरू शकतो त्यामुळे पर्यायी सीमांकन करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा दगडी नंबरी लावून हद्द निश्चित करण्यात यावी व नंबरी हटवणाऱ्यांच्या सर्व शासकीय योजना बंद करून फौजदारी गुन्हे दाखल करावे.

८) शेतरस्त्यांबाबत झालेल्या शासननिर्णयाच्या अंमलबजावणीचा अहवाल ठराविक कालावधी जाहीर करून प्रदर्शित करावा.

९) ज्या क्षेत्राला सर्वेनंबरमध्ये रस्ता घेता येत नाही त्या ठिकाणी गटाप्रमाणे १२ फुटाचा रस्ता देण्यात यावा.

१०) शेतरस्ते अडवणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसुल करून फौजदारी कारवाई करावी. शासन निर्णयांच्या अंमलबजावणीसह विविध मागण्यांसाठी चळवळीच्या वतीने सर्व आमदारांसह मंत्र्याना पेरू व शेतरस्ता जनजागरण टोपी निवेदन देण्यात आले यावेळी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे, नाथाभाऊ शिंदे, सुरेश वाळके, शांताराम पानमंद, विजय शेलार, ॲड. सागर जोरी, रामहरी बोंबे, सुरेश भुजबळ, दत्तात्रय बांगर, दशरथ वाळूंज, बबन गुंड, भाऊसाहेब वाळूंज, प्रकाश वाखारे, भास्कर हिंगे, दत्ता यवले, रविंद्र वाखारे, बाळासाहेब थोरात, सोमनाथ कुम्भार्डे, मोतीराम गांगुर्डे, अशोक जाधव, निवृत्ती काळे यांसह राज्यभरातील विविध जिल्ह्यातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एस.टी महामंडळ नवीन ८ हजार बस खरेदी करणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, मुंबई :** एस.टी उत्पन्नाचे साधन नाही तर राज्यातील ग्रामीण भागापर्यंत प्रवासी वाहतूक सेवा देणारे माध्यम आहे. राज्यातील जनतेला दर्जे दार प्रवासी वाहतूक सेवा देण्यासाठी ८ हजार नवीन एस.टी बसेसची खरेदी केली जाणार आहे. यामध्ये पहिल्या टप्यात तीन हजार आणि दुसऱ्या टप्प्यात ५ हजार बसची खरेदी केली जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सदस्य सचिन अहिर यांनी विधान परिषदेत या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात परिवहन मंत्री सरनाईक यांनी ही माहिती दिली. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, श्रीकांत भारतीय, भाई जगताप, अनिल परब, प्रविण दरेकर, सदाभाऊ खोत आणि सतेज पाटील यांनी सहभाग घेतला.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले, राज्यात बससेवेची वाढती गरज लक्षात घेऊन शासनाने बस खरेदीचा निर्णय घेतला आहे. ३ हजार बस खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण केली असून ५ हजार बसेससाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. तसेच येत्या ५ वर्षात टप्प्या टप्प्यात २५ हजार बसेस खरेदी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. म हामंडळाच्या कामगारांची देय असलेले देणी देण्यास निधीची कमतरता भासणार असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. ते म्हणाले, एसटी महामंडळाच्या कामगारांची देय





असलेली ४ हजार १९० कोटी इतकी रक्कम देण्यात येत आहे. यासाठी निधीची पुरवणी मागण्यांमध्ये मागणी करण्यात आली आहे.

यामुळे कामगारांची थकबाकी येत्या ६ ते ८ महिन्यांत कमी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर एसटी महामंडळाचे बस डेपो व जागा विकसित करण्यात येणार आहेत. याच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठीही वापरण्यात येईल. एस.टी महामंडळांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक स्रोत निर्माण केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच परिवहन विभागाने हळूहळू डिझेल बसेस हटवून पर्यावरणपूरक पर्यायी बसचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# नवी मुंबई महानगरपालिका महापे शाळेत रंगली चित्रकलेची कार्यशाळा

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१०, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका संचालित शाळा क्रमांक ४० महापे येथे नुकतेच चित्रकलेची रंग भरण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळा स्प्रेडिंग हैप्पीनेस इंडिया फाउंडेशन, शिफ सचिन तेंडुलकर फाउंडेशन, शनाईडर इंडिया इलेक्ट्रिक कंपनी, स्माईल फाउंडेशन आणि नवी मुंबई मनपा शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत सर्वप्रथम चित्रकार राजू माशाळकर यांच्या ब्रश मधून विविध प्रकारच्या पर्यावरण संरक्षण, माझी वसुंधरा, सामाजिक, शैक्षणिक आदी विषयावर आधारित चित्रांचे स्केच रेखाटन




आले होते. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या वतीने सर्व चित्रांमध्ये प्रत्यक्ष रंग भरण्याचे काम करण्यात आले.

या कार्यशाळेत शनाईडर इंडिया इलेक्ट्रिक कंपनीचे एडमिन हेड विनायक सुर्वे, कंपनी मॅनेजर सुधांशू गुप्ता, डेप्युटी जनरल मॅनेजर सारंगधर देशमुख, स्माईल इंडिया फाउंडेशनचे प्रादेशिक व्यवस्थापक विजय बसक , शाळा व्यवस्थापन समि तीच्या अध्यक्षा दुर्गा ठाकूर , सदस्या म हबूब शेख , शाळेचे मुख्याध्यापक मारुती गवळी , माजी मुख्याध्यापक रवींद्र म्हात्रे, यांच्यासह स्लायडर इंडिया कंपनीचे विविध विभागात काम करणारे ४० कर्मचारी शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने सहभागी झाले होते . विविध विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बोटे आज रंगभरण करताना तेवढ्याच सफाईदारपणे आणि अत्यंत उत्साहाने चालत होती. सर्वांनी अत्यंत आनंदाने सदर रेखाटलेल्या चित्रांमध्ये रंग भरण्याचे काम केले . सर्व कर्मचारी अत्यंत उत्साहाने स्वयंपूर्णतेने या उपक्रमात सहभागी झाले होते. सदर उपक्रमामुळे शाळेचा परिसर अत्यंत जिवंत आणि आकर्षक झाला असल्याचे मत यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दुर्गा ठाकूर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जाधव यांनी केले. सदर कार्यक्रमात प्रीती भंडारे, विश्रांती चांगण, रुपाली घोडके, स्वाती कोर, दत्तात्रय बांबळे, रीना घाटे, अंजली आगदिघे या शिक्षक तसेच महेश पाटील, अनिल तांबे, जनार्दन म्हात्रे, अनिता देवकर, मंदा लोंढे, धर्मेश कोळी , मनोज मुकादम या शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग नोंदविला. शालेय आकर्षक चित्रमय आणि रंगीबेरंगी परिसर पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# जिद्द आणि चिकाटीचने यशप्राप्ती होतेच; मेजर कु.साहिल बचाटे

**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.१०, नेरुळ (नवी मुंबई) :** आयुष्यात आपल्या ध्येयासाठी पाठलाग केल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही. मेहनत आणि जिद्दीच्या बळावर त्यासाठी मेहनत केल्यास हे शक्य होतं. आपल्या जिद्दीपुढे आणि मेहनतीपुढे नियतीला देखील झुकावं लागतं. अशाच प्रकारची घटना नवी मुंबई मधील खारघर सात्तापा बचाटे मुळगाव राधानगरी कोल्हापुर यांचा मुलगा साहील बचाटे याच्या बाबतीत घडली आहे. अतिशय सामान्य कुटुंबातील साहील बचाटे हा तरुण जिद्दीच्या जोरावर भारतीय सैन्यात वायुसेनेत वयाच्या अवघ्या विस वर्षात रुजू



झाला आहे. अर्कडमीमधून त्याने सरावासह एम बी ए च्या सेकंड वर्षाचा अभ्यासक्रम ही चालू आहे. पासिंग आउट परेडमध्ये त्यांना वायुसेना या ठिकाणी गौरवण्यात आले. वायुसेनामध्ये निवड झाल्यानंतर वायुसेना पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांचे वडील व्यवसायाने सिडको बोर्ड सिक्योरिटी मध्ये कार्यरत असून साहिलची आई गृहिणी (house wife) आहे. लहान वयात साहीलची वायुसेनेत निवड झाल्याची बातमी कळाल्यानंतर गावकर्यांनी आणि नातेवाईकांनी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत केले. निष्ठा आणि मन लावून देशाची सेवा करणार भारतीय सैन्यामध्ये पदावर नियुक्त झाल्यानंतर बोलताना कु.साहील याने आपल्या आईवडिलांचे आभार मानले. त्यांच्या आशीर्वादामुळेच आपण हे यश मिळवू शकल्याचं त्यांनी यावेळी सांगितले. देशासाठी काहीतरी करण्याची इच्छा मनामध्ये असल्याने मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर आपण याठिकाणी पोहोचल्याचे देखील त्यांनी सांगितले. त्याचबरोबर निष्ठा आणि मन लावून देशाची सेवा करणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी म्हटले. याआधी देखील सामान्य कुटुंबातील अनेकजणांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या बळावर भारतीय सैन्यामध्ये स्थान मिळवण्याच्या घटना आपण बघितल्या आहेत. त्याचबरोबर विविध क्षेत्रामध्ये देखील अशाच पद्धतीने अनेकांनी यश मिळवले आहे. त्यामुळे तुम्हाला देखील यश मिळवायचे असल्यास याच पद्धतीने जिद्द आणि चिकाटी जवळ बाळगणे गरजेचे आहे. एक दिवस तुम्हाला यश नक्कीच मिळणार.

# थोडक्यात

## वलनी हायस्कूलच्या विद्यार्थिनींचे 'हिंदी राष्ट्रभाषा' परीक्षेत घवघवीत यश

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.१०, नागपूर :** महाराष्ट्र हिंदी राष्ट्रभाषा विभागामार्फत शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेत वलनी हायस्कूल, वलनी (ता. सावनेर, जि. नागपूर) येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी कु.जानवी प्रशांत देशमुख (इयत्ता दहावी, मराठी माध्यम) हिने महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावला. तर प्रबोध परीक्षा कु.सलोनी संतोष गौतम (इयत्ता नववी, हिंदी माध्यम) हिने विदर्भातून प्रथम येण्याचा मान मिळवला. या यशाबद्दल श्री अनंत शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.रवींद्र बिजवे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका चारुलता रवींद्र बिजवे यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे विषय शिक्षक डी.एम.पवार, एस.के.मेंढे व एस.वाय.मेश्राम यांनी ही विद्यार्थिनींचे कौतुक केले. यशस्वी विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय गुरुजनांना दिले.

## लोहा व मुदखेड महसूल व पोलीस यांची रेती घाटावर संयुक्त कारवाई

### अवैध रेती उत्खनन करणारे २ कोटी २० लाख रुपयांचा साहित्य नष्ट

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**




**दि.१०, मुदखेड (नांदेड) :** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार ऑपरेशन प्लश आऊट अंतर्गत नांदेड जिल्ह्यामध्ये रेती माफिया कडून अवैध मार्गाने रेती उपसा व वाहतूक संदर्भाने कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने बुधवार, दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजता पोलीस स्टेशन उस्माननगरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार व पोलीस स्टेशन मुदखेड येथील उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस अंमलदार व लोहा तहसीलचे तहसीलदार परळकर व मुदखेडचे नायब तहसीलदार संतोष कामटे त्यांच्यासोबत सज्जा मंडळ अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह मिळणाऱ्या माहितीवरून येळी शिवारातील गोदावरी नदीत अवैध रेती उपसा करणारे यांच्याविरोध छापा मारणे कामे गेले असता तिथे काही इसम विनापरवाना लोखंडे मोठे फायबर बोट व छोटे लोखंडी इंजन बोट च्या साह्याने गोदावरी नदी पात्रातून रेतीच्या अवैध रेती उपसा करीत असताना दिसून आले. पोलीस पथकास पाहून सदर इसम पळून गेले महाटी शिवारातील गोदावरी नदी लगत असणाऱ्या सीतानदीमध्ये घटनास्थळावर सात मोठे लोखंडी फायबर बोट किंमत १ कोटी ७५ लाख तीन छोटे लोखंडी इंजिन बोट किंमत ४५ लाख असा एकूण किमती २ कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर महसूल विभागाचे अधिकारी लोहा तहसीलदार परळीकर व मुदखेड तहसीलचे नायब तहसीलदार संतोष कामटेकर यांनी सदरी लोखंडी मोठे फायबर बोट व छोटे लोखंडे इंजन बोट मालक व चालक यांनी शासनाचे परवानगी घेतलेली नसल्याचे सांगितले वरून सदर ठिकाणी अवैध रेतीचा उपसा करीत असल्याची खात्री झाल्यानंतर महसूल विभागाचे अधिकारी त्यांनी आमचे समक्ष सदर साहित्याचा पंचासमक्ष रितसर पंचनामा जमा करून सदरचा मुद्देमाल हा जिलेटिनच्या साह्याने जागीच नष्ट करण्यात आला. सदर लोखंडी फायबर लोखंडी छोटे इंजिन बोट च्या मालकांची माहिती घेऊन त्यांच्याविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्याची प्रक्रिया चालू आहे. नायब तहसीलदार संतोष कामटेकर, तलाठी राजकुमार मस्के, राजू चव्हाण, शेषराव कोटूरवार हे उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१०, दापोली (रत्नागिरी) :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे विद्यालयाचे आदरणीय उप मुख्याध्यापक अर्जुन हल्लोळी यांच्या अध्यक्षखालील 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)' घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राध्यापक विठ्ठल केंद्रे यांनी उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आदरणीय शुभम दडमल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान, घनकचरा व्यवस्थापन जनजागृती याविषयी थोडक्यात प्रस्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक शुभम दडमल यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी घनकचरा व्यवस्थापन जनजागृती काळाची गरज ओळखून मानवाच्या रोजच्या कृतीतून तयार होणाऱ्या अनेक टाकाऊ पदार्थांचा योग्य वापर केला तर टाकाऊ पदार्थ सुद्धा मौल्यवान स्रोत होऊ शकतो. तसेच त्यांनी जनजागृतीचे मुख्य उद्देश स्पष्ट केले- कचरा कमी करा, पुनर्वापर, पुनर प्रक्रिया, ओला कचरा सुका कचरा वेगळा करा, कंपोस्ट खत निर्मिती, प्लास्टिकचा वापर कमी करा, सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट केले.

या घनकचरा जनजागृती चे फायदे- आरोग्य, पर्यावरण, सौंदर्य,ऊर्जा बचत. तसेच यासाठी आपण काय करू शकतो- प्रथमत: स्वतः सुरुवात करा, कुटुंबाला प्रेरित करा, शाळा महाविद्यालय सोसायट्यांमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करा, स्थानिक प्रशासनाच्या कचरा व्यवस्थापन मोहिमेमध्ये सहभागी व्हा. अशा विविध गोष्टींविषयी स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन जनजागृती याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशाळेचे उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांनी घनकचरा जनजागृतीचे उद्दिष्ट सांगितले प्रत्येकामध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे, स्वच्छ आणि निरोगी परिसर राखण्यास मदत करणे, कचऱ्यापासून ऊर्जा आणि संसाधने मिळवण्यासाठी प्रोत्साहन देणे या उपायांमुळे घनकचऱ्याची समस्या प्रभावीपणे सोडवता येते आणि एक स्वच्छ सुंदर व आरोग्यदायी समाज निर्माण करता येतो तसेच आजच्या कार्यक्रमाचे प्रम ुख मार्गदर्शन शुभम दडमल यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन जनजागृती याविषयी सखोल माहिती सांगितली त्या माहितीचे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त अवलोकन करावे असे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला शाळेचे पर्यवेक्षक शांताराम बैकर, शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक महेश गिरी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.